नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक १४/१२/२०२५ ( रविवार )

---

## दरोडा टाकणाऱ्या आरोपीतांना अवघ्या १२ तासात केले निष्पन्न. २ गुन्हे उघड, ७ आरोपी अटक, स्थानिक गुन्हे शाखेची कामगिरी

**पोलीस स्टेशन पारशिवनी** :— पोलीस स्टेशन पारशिवनी अंतर्गत फिर्यादी नामे अब्दुल गफार अब्दुल करीम, वय ७९ वर्ष, रा गांधी चौक पारशिवनी हे त्यांचे पत्नी सह घरी हजर असताना अनोळखी इसमांनी फिर्यादीचे घरात घुसुन फिर्यादीला मारहाण करून फिर्यादीच्या पत्नीच्या गळयातील १० ग्रॅम वजनाचे सोन्याचे मंगळसुत्र किंमती ५०,०००/— रू जबरीने ओढुन काढुन घेतले. तसेच किचन रूम मध्ये जावुन रूममध्ये असलेले लोखंडी कपाट उघडुन अंदाजे १०००/— रू लुटुन मोटरसायकलने पळुन गेले. अश्या फिर्यादीचे तोंडी रीपोर्ट वरुन पो.स्टे. पारशिवनी येथे दिनांक १३/१२/२०२५ रोजी अपराध क्रमांक ५९४/२५ कलम ३०९(६), ३(५), भान्यासं, सन २०२३ गुन्हा नोंद आहे.

सदर गुन्हयाचे गांर्भिय लक्षात घेता मा. वरीष्ठ अधिकारी यांच्या मार्गदर्शनात पारशिवणी पोलीसांसोबत स्थानिक गुन्हे शाखा नागपुर ग्रामीण यांनी सुध्दा तात्काळ सदर गुन्हयाचा समांतर तपास सुरू केला. अवघ्या १२ तासात स्थानिक गुन्हे शाखा यांनी तांत्रिक पुरावे आणि गोपनिय बातमीदारांच्या माहिती वरून आरोपी १. **मंगेश रतीराम उईके, वय २६ वर्ष राहणार धापेवाडा** यास ताब्यात घेऊन कौशल्यपूर्ण विचारपूस करून आरोपीने मुख्य आरोपी **२. तनवीर युनुस कुरेशी,रा. धापेवाडा** याचे सांगणे वरून इतर साथीदार आरोपींचे मदतीने गुन्हा केल्याचे सांगितल्याने सदर गुन्हयात आरोपी क्रं १ आणि २ यांच्या सह आरोपी क्रं **३. प्रवीण देवराव महीकारकर, वय २८ वर्षे, राहणार इंदिरानगर वार्ड क्रमांक १२, ब्राह्मणी, तालुका कळमेश्वर, जिल्हा नागपूर ४. कमलेश उर्फ छोट्या दिलीप पंधराम, वय २१ वर्ष, राहणार इंदिरानगर**

**तालुका कळमेश्वर, जिल्हा नागपूर, ५. अक्षय राजकुमार बनसोड, वय २२ वर्षे, राहणार राडगाव डोरली, मुक्काम कळमेश्वर इंदिरानगर झोपडपट्टी, ६. आदित्य महेंद्र शर्मा, वय २१ वर्षे, राहणार ब्राह्मणी शिक्षक कॉलनी** यांचा शोध घेऊन ताब्यात घेण्यात आले. सदर गुन्हयातील आरोपी क्रं ७. **अब्दुल मतीन अब्दुल गफार शेख, वय ५२ वर्ष, राहणार पालोरा तालुका पार्सल जिल्हा नागपूर हा फिर्यादीचा मुलगा असुन त्यानेच** त्याचे वडिलांसोबत मालमत्तेच्या हिस्से वाटणीचे मत भेद असून त्याने गुन्हयातील इतर आरोपींना माझे वडिलांकडे प्रॉपर्टी विक्रीचे खूप रुपये आहेत घरात घुसून लुटून घ्या अशी माहिती दिल्या वरून गुन्हा केल्याचे सांगितले. त्याचप्रमाणे नमुद आरोपीतांनी २०२४ मध्ये फिर्यादीचे घरात घुसून चाळीस हजार रुपये जबरीने चोरी करून नेल्याचे उघड केले. आरोपींना ताब्यात घेऊन त्यांचेकडुन **१) रोख रक्कम नगदी ९५००/—रुपये २) मोसा क्र.एम एच ४० झेड ५२८८ किंमती ५०,०००/—रूपये ३) मोसा क्र एम एच ४० ए एन ७९२२ किंमती ५०,०००/—रू ४) ०२ अँड्रॉइड मोबाईल ५) १ कीपॅड मोबाइल असा एकुण १,५५,५००/—रूपयाचा मुद्देमाल जप्त केला आहे.**

**उघडकीस आलेले गुन्हे**

**१) पोलीस ठाणे पारशिवनी अप.क्र. ५९४/२५ कलम ३०९(६),३(५),३१० (२),३११ भा.न्या.सं.**

**२) अप. क्र. २०/२४ कलम ३९४, ४५८ भादंवी**

**सदर आरोपीतांना अटक करण्यात आली असुन पुढील तपास पारशिवणी पोलीस करीत आहेत.**




# खुनाचा गुन्हयाची केली उकल, आरोपीला अवघ्या ४ तासात केले निष्पन्न,कळमेश्वर पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन कळमेश्वर**:— सदर गुन्हा कळमेश्वर पोलीस स्टेशन अंतर्गत मौजा मोहगाव सावंगी शिवार, जि. नागपुर येथे दिनांक १३/१२/२५ चे रोजी घडला असुन यातील मृतक नामे अरूण रामाजी तुरारे वय ४३ वर्षे, वार्ड कं १५, धनगरपुरा, मोहपा कळमेश्वर जि नागपुर हा मोहगाव सावंगी शिवार येथील त्यांचे शेतात काम करीत होता.सदर मृतकाची पत्नी ही दुसऱ्या शेतात काम करत होती. मृतकाची पत्नी ही घरी जाण्यासाठी बोलविण्याकारीता गेली असता पती मिळुन न आल्याने तिने नातेवाईकांसह त्याचा शोध घेतला परंतु पती मिळुन न आल्याने तिने पोलीस चौकी मोहपा येथे माहीती दिली. पोलीस आणि वनविभाग यांनी मोहगाव सावंगी शिवार येथे नाल्यामध्ये मानवी अवयव जळत असल्याचे दिसले.सदर प्रेत मृतक अरूण रामाजी तुरारे याचेच असल्याबाबत समजले. मृतकाची पत्नी जोस्ना अरूण तुरारे यांनी सदर प्रकरणी तोडी रिपोर्ट दिल्यावरून पोलीस स्टेशन कळमेश्वर येथे कलम १०३ (१) भारतीय न्याय संहीता अन्वये गुन्हा नोंद आहे. फिर्यादी यांनी त्यांचे भासरे चंद्रशेखर तुरारे यांनीच सदर खुन केल्याचा संशय व्यक्त केला होता.

**सदर गुन्हयातील संशयीत आरोपी नामे चंद्रशेखर रामाजी तुरार,वय ५८ वर्ष, रा मोहपा, ता. कळमेश्वर, जि. नागपुर याचेकडे पोलीसांनी कौशल्यपुर्वक विचारपुस केली**

**असता त्याने शेती चे आणि घराचे हिस्याचे कारणावरून मृतकाचा खुन केल्याबाबत कबुली दिली. अवघ्या ४ तसात कळमेश्वर पोलीसांनी सदर गुन्हयाची उकल करत आरोपीला ताब्यात घेतले आहे.**

## फसवणुक व चोरी करणारे २ अज्ञात आरोपी निष्पन्न
## ३ गुन्हे उघड
## स्थानिक गुन्हे शाखा आणि जलालखेडा पोलीस यांची संयुक्त कामगिरी

पोलीस ठाणे जलालखेडा १) अप. क्र. ५३५/२५ कलम ३०३, ३१९(२), ३(५) भा. न्या.सं. ,व २) अपराध क्र. ६१५/२०२५ कलम ३०३, ३१९(२), ३(५) भा. न्या.सं च्या दाखल गुन्ह्यात स्थानिक गुन्हे शाखेचे पथक आरोपीचा शोध घेत असता दिनांक १२/१२/२०२५ रोजी गुप्तबातमीदारांकडुन मिळालेली माहिती तसेच तांत्रिकरित्या तपास करून सदर संशयीत आरोपीचे जलालखेडा पोलीस आणि तिवसा पोलीस जि अमरावती यांच्या मदतीने तिवसा जि.अमरावती येथील अशोक नगर या वस्तीतील राहणारे **आरोपी १) रामराव भीमराव ढोबळे, वय ५४ वर्ष, रा. अशोक नगर, तिवसा अमरावती व तिवसा येथील अमोल ज्ञानेश्वर धानोरकर, वय ३७ वर्ष, रा. धमंत्री जिल्हा अमरावती** या दोघांना ताब्यात घेवून सदर गुन्ह्याबाबत विचारपूस केली असता त्या दोघांनी सोबत मिळून त्याचे मोटार सायकलने पो. स्टे जलालखेडा हद्दीतील १) मौजा– खपरी व २) मौजा लोहरी सावंगी ३) पो. स्टे. काटोल हद्दीतील मौजा येनवा या गावात फसवणुक करून चोरी चे गुन्हे केल्याची कबुली दिली वरील दोन्ही आरोपींना ताब्यात घेऊन त्यांच्याकडुन मुद्देमाल वरील तिन्ही गुन्हयात चोरी गेलेले सोन्या चांदीचे दागिने आणि सदर गुन्ह्यात आरोपींनी वापरलेली वाहन बजाज कंपनीची मोटार सायकल क्र. एम एच २७ डि एक्स .११९२ असा एकूण १,६३,५००/– रूपयांचा मुद्देमाल हस्तगत केला आहे. आरोपीतांना ताब्यात घेण्यात आले आहे.

**उघड गुन्हे**

१) पो.स्टे जलालखेडा अप. क्र. ५३५/२५ कलम ३०३, ३१९(२), ३ (५) भा.न्या.सं.

२) पो.स्टे. जलालखेडा अप. क्र. ६१५/२५ कलम ३०३, ३१९(२), ३(५) भा.न्या.सं.

३) पो.स्टे काटोल अप. क्र. ६८२/२०२४ कलम –३०५(अ) ३(५) भा.न्या.सं.



## अवैधरित्या रेतीची चोरटी वाहतुक करणाऱ्या आरोपीतांविरूध्द गुन्हा नोंद भिवापूर पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन भिवापूर :–** दिनांक १३/१२/२०२५ रोजी पोस्टे भिवापूर पोलीस पेट्रोलीग करीत असतांना त्यांना गुप्त बातमीदारांकडुन खात्रीशीर माहीती मिळाली की, अवैधरित्या विनापरवाना रेतीची चोरटी वाहतुक केली जात आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीसांनी पोलीस स्टेशन टी पॉईंट येथे नाकाबंदी केली असता संशयीत वाहन टाटा ट्रक क्रमांक एम एच ३३/ टी २११५ मिळुन आला. वाहन थांबवुन वाहनाची पाहणी केली असता त्यामध्ये रेती आढळुन आली. वाहन चालकाला नाव पत्ता विचारला असता, **शारीक इसराईल शेख, वय ४१ वर्ष, रा. शिवाजी वार्ड, गडकुंभली रोड, साकोली ता. साकोली जि. भंडारा ह.मु. भाई तलाव, पवनी ता. पवनी जि. भंडारा** अशी माहीती प्राप्त झाली.त्याला परवान्याबाबत विचारणा केली असता त्याने कोणताही परवाना नसल्याबाबत सांगितले. वाहन मालकाचे नाव

राहुल नखाते रा. पवनी ता. पवनी जि. भंडारा असे असल्याची माहीती प्राप्त झाली. पोलीसांनी पंचासमक्ष ट्रक मधुन १) ०८ ब्रास रेती किंमती ४०,०००/— रूपये आणि २) १२ चक्का टाटा ट्रक क्रमांक एम. एच.३३ टी २११५ किंमती ३०,००,०००/— रुपये असा एकुण ३०,४०,०००/—रूप**या**ंचा मुददेमाल जप्त केला आहे.

सदर प्रकरणी वाहन नमुद चालक व मालक याच्या विरूध्द पोस्टे भिवापूर येथे कलम ३०३(२), ३(५), ४९ भा.न्या.सं सहकलम ४८(७) ४८(८) म.ज म सहीता सहकलम १५ पर्यावरण संरक्षण अधिनियम अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## अवैधरित्या कत्तलीकरीता जनावरांना बांधुन ठेवणाऱ्या आरोपी विरूध्द गुन्हा नोंद
## १९ गोवंश जनावरांची सुटका, काटोल पोलीसांची कामगिरी

**पोलीस स्टेशन काटोल** :— दिनांक १३/१२/२०२५ रोजी काटोल पोलीसांना गुप्त बातमीदारांकडुन खात्रीशीर माहीती मिळाली की, मौजा कोंढासावळी ता. काटोल येथे **आरोपी समिर बशिर शेख रा. कोंढासावळी ता. काटोल** याने जनावरांची कत्तल करण्याकरीता जनावरे त्याच्या घरासमोर बांधुन ठेवलेले आहे. मिळालेल्या माहीतीच्या आधारे पोलीसांनी तात्काळ कोंढासावळी येथे जावुन घटनास्थळी जावुन पाहणी करून चौकशी केली असता लहान मोठे १९ गोवंश जनावरे आरोपीचे घरासमोर बांधुन ठेवलेले होते. सदर जनावराबाबात आरोपीला विचारपुस केली असता सदर जनावरे आमची नाही असे सांगितले तसेच गावातील लोकांना विचारपुस केले असता गावातील लोकांनी सदरचे जनावरे हे समीर बसीर शेख याचेच असल्याचे सांगितले. जनावराचे आरोपीकडे कोणतेही खरेदी विक्री चे कागदपत्रे नसल्याने आरोपीकडुन पोलीसांनी पंचासमक्ष घटनास्थळावरून लहान मोठे १९ गोवंश जनावरे असा एकुण किंमती १,३८,०००/— रूपयाचा मुददेमाल जप्त केला.

नमुद प्रकरणी **आरोपी समिर बशिर शेख रा. कोंढासावळी ता. काटोल** याच्या विरूध्द महाराष्ट्र पशु संरक्षण अधिनियम अन्वये गुन्हा नोंद केला आहे.

## महालोक अदालत मध्ये नागपुर ग्रामीण जिल्हयातील १३७३ प्रकरणे निकाली, १३,२९,५००/— रूपयांचा दंड वसुल

नागपुर ग्रामीण जिल्हया अंतर्गत दिनांक १३/१२/२०२५ रोजी आयोजीत महालोकअदालत यशस्वी रित्या पार पडली. नमुद लोकअदालत मध्ये खालील प्रमाणे प्रकरणे निकाली काढण्यात आली. नागपुर ग्रामीण जिल्हयातील सर्व २१ पोलीस स्टेशनमधील वरप्रमाणे कलम २८५ भा.न्या.सं अन्वये (सार्वजनिक ठिकाणी वाहतुकीस अडथळा किंवा धोकादायक रित्या वाहन उभे करणे ) ९०७ प्रकरणे, मदयपान करून वाहन चालविणे ड्रंक ॲड ड्राईव्ह च्या २५० केसेस , जुगाराच्या ६७ प्रकरणे तसेच इतर प्रकरणे असे एकुण **१३७३ प्रकरणे निकाली काढण्यात आली आहे.तसेच १३,२९,५००/— रूपयांचा दंड वसुल करण्यात आला आहे.**

## अवैधरित्या विनापरवाना दारू काढणारे, दारू बाळगुण विक्री करणारे तसेच सेवन करणाऱ्या आरोपीतांविरूद्ध ०५ गुन्हे नोंद

दिनांक १३/१२/२०२५ रोजी दारूबंदी कायदा अंतर्गत विविध पोलीस स्टेशनला पोलीसांनी अवैधरित्या दारू बाळगुन विक्री करणाऱ्यांवर छापा टाकुन देशी दारू, मोहाफुल दारू असा एकुण ३१४०/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला.

पोलीस स्टेशन कोंढाळी येथे एकुण २ गुन्हे नोंद आहे. पोलीस स्टेशन पारशिवनी येथे १ गुन्हा नोंद आहे. पोलीस स्टेशन खापा येथे १ गुन्हा नोंद आहे. पोलीस स्टेशन बुट्टीबोरी येथे १ गुन्हा नोंद आहे. महाराष्ट्र दारू बंदी अधिनियम अन्वये एकुण ०५ गुन्हे नोंद केले आहे.

**सदर कारवाईत ५०४० मिली देशी दारु, ०९ लीटर मोहाफुल दारू असा एकुण ३१४०/— रूपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. नाशवंत मुद्देमाल पंचनामा कारवाई करून नष्ट करण्यात आला आहे.**

मा. पोलीस अधिक्षक
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर
यांच्या मान्यतेने